## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०४ यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की :

माझे नाव : हिरामण अण्णासाहेब टाव्हरे
माझे वय : ३१ वर्षे,
व्यवसाय : शेती,
राहणार : अवसरी बुद्रुक, ता. आंबेगाव, जि. पुणे.

## सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती. एस. आर. पाचारणे यांचे मार्फत

**१.** दिनांक १४.०५.२०११ रोजी पोलिसांनी मला मंचर पोलिस स्टेशन येथे बोलविले होते. मंचर पोलिस स्टेशनला गेल्यानंतर पोलिसांनी माझेसमक्ष पंचनामा केला व मी त्यावर पंच म्हणून सही केली. पोलिस स्टेशनला संदीप दळवी हजर होता. पोलिसांनी पंचनामा कशाचा केला हे मला आता आठवत नाही. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर पंच क्र. २ म्हणून माझी सही आहे. पंचनाम्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **निशाणी क्र. ३७** देण्यात येते.

## उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. व्ही. एन. चासकर यांचे मार्फत.

**२.** हे म्हणणे खरे आहे की मी मंचर पोलिस स्टेशन येथे पोलिस मित्र म्हणून काम करीत होतो. हे म्हणणे खरे आहे की स्वप्नील कानडे हा सुध्दा माझेसोबत पोलिस मित्र म्हणून काम करीत होता. हे म्हणणे खरे आहे की न्यायालयामध्ये पंच म्हणून मी खूपदा साक्ष दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की भरपूर पंचनाम्यावर माझे सहया आहेत. हे म्हणणे खरे आहे की मंचर पोलिस स्टेशन येथे माझे नेहमी जाणे येणे असते. हे म्हणणे खरे आहे की माझे पोलिसांशी चांगले मैत्रीपूर्ण संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की पोलिस सांगतील तिथे मी सही करतो. हे म्हणणे खरे आहे की पोलिसांची मर्जी राखण्यासाठी सुध्दा मी कधी कधी पंचनाम्यावर सही करतो. हे म्हणणे खरे आहे की पंचनाम्यामध्ये काय लिहिले आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की मी पंचनामा न वाचता पोलिसांच्या सांगण्यानुसार सही केली.
उलटतपास संपला.

श्रवणोत्तर स्वीकृत

दिनांक : २२/०१/२०२० (एन. डी. मेश्राम)
घोडेगाव प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, घोडेगाव